कॅप्टिव्ह मार्केट योजना - निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्र:- सपववि-३७०१२/७६/२०२५-DESKTEX-२

१४ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २७ ऑगस्ट, २०२६

वाचा : १) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र.धोरण २०२३/प्र.क्र.८१/टेक्स-५, दि.०२.०६.२०२३.

२) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र. धोरण २०२३/प्र.क्र.१०६/टेक्स-५, दि.०३ नोव्हेंबर, २०२३.

३) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. सपववि-३७०१२/९८/२०२३-DESKTEX-२, दि.१० नोव्हेंबर, २०२३.

४) शासन पत्र क्र. सपववि-३७०१२/९८/२०२३-टेक्स-२ (६४९४८८), दि. ०९ सप्टेंबर, २०२४.

५) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र-: सपववि२०२५/७६/३७०१२-DESKTEX-२, दिनांक ०४ नोव्हेंबर, २०२५.

६) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र:- सपववि-३७०१२/७६/२०२५ DESKTEX-२, दिनांक २४ मार्च, २०२६.

७) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र:- सपववि-३७०१२/७६/२०२५ DESKTEX-२, दिनांक १६ जुलै, २०२६.

प्रस्तावना :-

राज्याचे “एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८” वाचा क्र. १ येथे नमूद दि.०२.०६.२०२३ च्या शासन निर्णयान्वये जाहीर करण्यात आले आहे. सदर शासन निर्णयामधील परिच्छेद क्र.११ (३) नुसार अंत्योदय शिधापत्रिका धारक कुटुंबाना वस्त्रोद्योग विभागामार्फत यंत्रमागावर विणलेली प्रति कुटुंब प्रतिवर्षी एक साडी उपलब्ध करुन देण्याची कॅप्टिव्ह मार्केट योजना वाचा क्र. ३ नुसार राज्यात सुरु करण्यात आली आहे. सदर योजनेसाठी महाराष्ट्र राज्य सन २०२३-२४ व २०२४-२५ या दोन वर्षाकरीता निश्चित केलेल्या पुरवठादार संस्थांची सूची (पॅनल) व दर करारास सन २०२५-२६ या एका वर्षाकरिता दिनांक १६.१०.२०२५ च्या पत्रान्वये मुदतवाढ दिली आहे. सदर पॅनल मधील संस्थांकडून शासनाने विहीत केलेल्या साड्यांच्या स्पेसिफिकेशन नुसार अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडे उपलब्ध असलेल्या अंत्योदय शिधापत्रिकाधारक कुटुंबांची संख्या तपासून तेवढ्या साड्यांचे उत्पादन करण्यात येणार

आहे. तसेच सदर साडयांचे वितरण राज्याच्या सार्वजनिक वितरण प्रणालीअंतर्गत रास्त भाव दुकानांमधून करण्यात येणार असल्याने सदर साडया सर्व जिल्ह्यातील गोदामांपर्यंत पुरवठा करण्यात येणार आहेत. यंत्रमाग महामंडळाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार सदर योजनेकरीता साडयांचे, कापडी पिशव्यांचे उत्पादन, वाहतूक, जाहिरात, प्रसिध्दी, साठवणूक, हमाली व इतर खर्चासाठी वाचा क्र. ५ येथे नमूद दि.०४.११.२०२५ च्या शासन निर्णयान्वये रु.९९.९६ कोटी इतका निधी खर्च करण्यास प्रशासकीय मान्यता दिली आहे.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात सदर योजनेकरीता रु.१००.०० कोटी इतका निधी मागणी क्र.व्ही-२, २८५१, ग्रामोद्योग व लघुद्योग, (००) ११०, संमिश्र ग्रामोद्योग व लघुद्योग आणि सहकारी संस्था, (०३) एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८, (०३) (०१) एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ अंतर्गत कॅप्टिव्ह मार्केट योजना (कार्यक्रम), ३३, अर्थसहाय्य (२८५१ ७४४५) अंतर्गत अर्थसंकल्पित करण्यात आलेला होता. परंतु सुधारित अर्थसंकल्पानुसार सदर निधी रु. ७०.०० कोटी इतका करण्यात आला. त्याअनुषंगाने सदर योजनेकरीता सन २०२५-२६ करिता रु.९९.९६ कोटी इतक्या रकमेचा निधी वितरणाचा प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आला होता. त्यानुसार सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरिता सुधारित अर्थसंकल्पित रु. ७०.०० कोटी तरतुदीपैकी रु. ७०.०० कोटी वितरीत करण्यास वित्त विभागाने मान्यता दिलेली होती. त्यानुषंगाने, वाचा क्र. ६ येथील शासन निर्णयान्वये रु. ७०.०० कोटी महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळाला वितरीत करण्यात आले. तसेच मा. मुख्यमंत्री महोदयांनी सद्यस्थितीत राबविण्यात येणाऱ्या व प्रस्तावित योजनांचा आर्थिक भार, कर्जे व इतर दायित्व, तसेच राजकोषीय तूट या सर्व बाबी विचारात घेता प्रस्तुत कॅप्टिव्ह मार्केट योजना पुढील आर्थिक वर्षात सुरु ठेवणे संयुक्तिक होणार नाही व सदर योजना बंद करण्याबाबत निर्णय घेताना या योजनेंतर्गत प्रलंबित दायित्व अदा करणे आवश्यक आहे असे निर्देश दिले होते. त्यानुषंगाने वाचा क्र. ७ येथील दि.१६.०७.२०२६ च्या शासन निर्णयान्वये सदर योजना बंद करण्यात आली आहे.

त्यास अनुसरून सदर योजनेकरीता साड्यांचे, कापडी पिशव्यांचे उत्पादन, वाहतूक, जाहिरात, प्रसिध्दी, साठवणूक, हमाली व इतर खर्च यासाठी महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळास उर्वरित रु.२८.३५ कोटी इतका निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात अंत्योदय शिधापत्रिका धारक कुटुंबाना वस्त्रोद्योग विभागामार्फत यंत्रमागावर विणलेली प्रति कुटुंब प्रतिवर्षी एक साडी उपलब्ध करुन देण्याच्या कॅप्टिव्ह मार्केट योजनेअंतर्गत साडयांचे, कापडी पिशव्यांचे उत्पादन, वाहतूक, जाहिरात, प्रसिध्दी, साठवणूक, हमाली यासाठी रुपये २८.३५ कोटी (रुपये अठ्ठावीस कोटी पस्तीस लाख फक्त) इतका निधी सदर योजनेची नोडल संस्था असलेल्या महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळाला वितरीत करण्यास या शासन निर्णयाव्दारे मंजूरी देण्यात येत आहे. **सदर देयक हे बिनशर्त स्वरुपाचे आहे.**

२.	सदर योजनेची अंमलबजावणी ही वाचा क्र. ३ येथे नमूद दि.१०.११.२०२३ च्या शासन निर्णयातील कार्यपद्धतीनुसार करावी.

३.	शासनाने विहित केलेल्या निकषाप्रमाणे उत्पादन केलेल्या साड्या व्यवस्थितरित्या सार्वजनिक वितरण व्यवस्था (PDS) यंत्रणेच्या तालुका स्तरावरील गोदामापर्यंत पोच झाल्याची महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळाने खात्री केल्यानंतरच संबंधितांना देयके अदा करण्यात यावीत.

४.	महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळाने संबंधितांची देयके अदा केल्यानंतर त्याबाबतचे विनियोग प्रमाणपत्र देयकांच्या प्रतीसह शासनास सादर करावे. संबंधितांची देयके अदा केल्यानंतर शिल्लक निधी महामंडळाने शासन खाती जमा करावा.

५.	महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळाने सर्व साड्यांचे कापडी पिशवीसह वितरण झाल्यानंतर शासनास सविस्तर अहवाल सादर करावा.

६.	वित्त विभाग शासन परिपत्रक अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०९ एप्रिल, २०२६ मधील परिच्छेद ४ च्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळाला सदर योजनेअंतर्गत वितरीत करावयाचा निधी हा परिशिष्ट क्र. ९ मधील “३३ अर्थसहाय्य” या बाबी करिता मंजूर करण्यात येत असून, सदर परिशिष्टातील तपासणी सूचीनुसार लागू असणाऱ्या मुद्यांची पूर्तता करुन घेण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्या., नवी मुंबई यांची राहील.

७.	प्रस्तुत प्रयोजनांकरिता उपलब्ध करुन देण्यात आलेला निधी हा सन २०२६-२७ वर्षाकरिता खालील लेखाशिर्षांतर्गत मंजूर करण्यात आलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा:-

मागणी क्र.व्ही-२,

२८५१,ग्रामोद्योग व लघुद्योग,
(००)११०,संमिश्र ग्रामोद्योग व लघुद्योग आणि सहकारी संस्था,
(०३) एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८,
(०३) (०१) एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ अंतर्गत कॅप्टिव्ह मार्केट योजना (कार्यक्रम),
३३, अर्थसहाय्य (२८५१ ७४४५)

८.	या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेल्या रक्कमेचे आहरण करून महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्या, मुंबई यांना वितरीत करण्याकरिता श्री. सु. पु. पांगारकर, कार्यासन अधिकारी (रोखशाखा) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२ यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून व श्री. तुषार पवार, उप सचिव (रेशीम/वस्त्रोद्योग) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय मुंबई -३२ यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेली रक्कम अधिदान व लेखाधिकारी कार्यालय मुंबई, येथून आहरीत करून महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, नवी मुंबई (MAHARASHTRA STATE POWERLOOMS CORPORATION LTD. MUMBAI) यांच्या CANARA BANK, Nerul West, Navi Mumbai- ४००७०६. A/c no - ५०३५३०५००००३३,

IFSC Code - CNRB००१५४९६, MICR CODE - ४०००१५२४८ या बँक खात्यावर RTGS द्वारे वितरीत करण्याची कार्यवाही करावी.

९. सदर शासन निर्णय वित्त विभाग परिपत्रक क्रमांक क्र. अर्थसं-२०२६/ प्र.क्र.४०/ अर्थ-३ दि. ०९ एप्रिल, २०२६ अन्वये प्रशासकीय विभागास प्राप्त अधिकार अन्वये व वित्त विभाग अनौ.सं.क्र.४८१/२०२६/व्यय-२ दि.१८.०८.२०२६ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२६०८२७१२०२०९४७३६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

NISHA MANOHAR MAHAJAN

Digitally signed by NISHA MANOHAR MAHAJAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SESD, 2.5.4.20=9A9F1749DEC86C69520DC99C8A73D64E830153EE031B1B93C743E21A94CD3E93, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=78A137191EFEA41DA17C39BA5785218CEB91615A2FE9ADACE7540AD0AC40F348, cn=NISHA MANOHAR MAHAJAN
Date: 2026.08.27 12:03:44 +05'30'

(निशा महाजन)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उपमुख्यमंत्री तथा मंत्री (नगरविकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. उपमुख्यमंत्री तथा मंत्री (राज्य उत्पादन शुल्क , क्रिडा व युवक कल्याण अल्पसंख्याक) महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. मंत्री (वस्त्रोद्योग), महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
७) सचिव (वस्त्रोद्योग), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) सचिव (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग), मंत्रालय, मुंबई.
९) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर.
१०) महालेखापाल (लेखापरीक्षा), मुंबई / नागपूर.
११) महालेखापाल (वाणिज्यिक लेखापरीक्षा), मुंबई / नागपूर.
१२) आयुक्त (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर.
१३) उपसचिव (वस्त्रोद्योग), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ, नवी मुंबई
१५) कक्ष अधिकारी (रोख शाखा), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
१६) अवर सचिव (१७-स) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७) निवड नस्ती (टेक्स-२)